2018-19

**Peer Reviewed Referred
and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL**

ISSN 2277-5730



Peer Reviewed (22)

# AJANTA

**Volume - VII, Issue - IV
Marathi Part - II
October - December - 2018**

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

**AJANTA PRAKASHAN**

1/6

# CONTENTS OF MARATHI PART - II



| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| १४ | कला व वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास<br>**प्रा. प्रमिला अधिकाराव सुर्वे** | ६०-६६ |
| १५ | कोल्हापूरातील वसतिगृह चळवळ : दुर्बल घटकांचे समावेशन<br>**डॉ. अर्चना श्रीराम जाधव** | ६७-७२ |
| १६ | कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्याचे उत्पन्न आणि खर्च विषयक विश्लेषण<br>**सहा. प्रा. डि. जी. चिघळीकर** | ७३-७६ |
| १७ | महात्मा गांधीजीची प्रायोगिक शिक्षण योजना नई तालीम स्वरुप व सद्यस्थितीत उपयोग<br>**प्रा. डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके** | ७७-८३ |
| १८ | धर्म, अंधश्रद्धा आणि स्त्रिया<br>**डॉ. अर्चना आर. कांबळे (जगतकर)** | ८४-८९ |
| १९ | महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ एक दृष्टिक्षेप<br>**पाटील युवराज आनंदराव** | ९०-९२ |
| २० | दळणवळणाच्या साधनात सागरी मार्गाचे महत्त्व<br>**प्रा. डॉ. एस.एल. म्हात्रे** | ९३-९६ |
| २१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान<br>**श्री नामदेव मल्लाप्पा मधाळे** | ९७-१०१ |
| २२ | राज्यपाल पद व भूमिका<br>**प्रा. एस. जी. न्हिवेकर** | १०२-१०४ |
| २३ | राष्ट्रनिर्मते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**सिद्धार्थ मुंगे** | १०५-१०७ |
| २४ | मध्ययुगीन मंगळवेढ्यातील उपेक्षित स्त्री संत : संत कान्होपात्रा<br>**प्रा. डॉ. कुंभार अनिल भिमराव** | १०८-११२ |
| २५ | मानवी भूगोलाचे वर्तमान जीवनातील महत्त्व<br>**प्रा. डॉ. संगिता घार** | ११३-११६ |
| २६ | संसदीय सभागृहामध्ये का वाढतोय असंसदीयपणा?<br>**प्रा. आर. जी. शिंदे** | ११७-११९ |

VOLUME - VII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १६. कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्याचे उत्पन्न आणि खर्च विषयक विश्लेषण

**सहा. प्रा. डि. जी. चिघळीकर**
अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

**प्रस्तावना**

कोल्हापूर जिल्हयाची ओळख एक कृषीप्रधान जिल्हा अशीच राहीलेली आहे. कृषी गणना 2001 नुसार जिल्हयात एकूण 6.13 लाख वहीत खातेदार आहेत. त्यांचे एकूण धारणक्षेत्र 4.83 लाख हेक्टर इतके आहे. कोल्हापूर जिल्हयामध्ये सर्वप्रकारच्या खातेदारांनी धारण केलेले सरासरी क्षेत्र फक्त 0.79 एवढे असून हे राज्यातील सर्वात कमी क्षेत्र आहे. कृषी गणना 2001 नुसार सिमांत 75.7 टक्के तर लहान 16.35 टक्के खातेदार तर एकूण सिमांत व लहान मिळून अल्पभूधारक खातेदारांचे प्रमाण 92.05 टक्के इतक्या मोठया प्रमाणात आहे. यावरून असे लक्षात येते की कोल्हापूर जिल्हा हा शेतक–यांचा जिल्हा असला तरी तो त्यातही अल्पभूधारक शेतक–यांचाच जिल्हा आहे. म्हणून सदर शोध निबंधांच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांचे सर्व मार्गाने मिळून असणारे वार्षिक उत्पन्न किती आहे. व ते आपल्या उत्पन्नातील सर्वाधीक रक्कम कोणत्या कारणासाठी खर्च करतात याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**शोधनिबंधाची उदीष्टे**

1. कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांच्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.
2. कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकरी सर्वाधीक खर्च कोणत्या कारणांसाठी करतात हे समजून घेणे.
3. शेतक–यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी व त्यांचे जीवनमानात वाढ करण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**शोधनिबंधाची गृहीतके**

1. अल्पभूधारक शेत–यांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे,त्यांना हालाखीचे जीवन जगावे लागत आहे.
2. अल्पभूधारक शेतकरी आपल्या उत्पन्नाचा सर्वाधीक भाग जिवनावश्यक वस्तूंवर खर्च करतात.
3. अल्पभूधारक शेतक–यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांच्या जीवनमानात वाढ करता येवू शकते.

**संशोधन पध्दती**

शोधनिबंधाचा अभ्यास करण्याकरीता प्राथमीक आणि द्वितीय स्वरूपाच्या साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमीक साधनसामग्री मध्ये अनुसुचीच्या माध्यमातून जिल्हयातील 1200 गावा पैकी 10 टक्के गावांची निवड करण्यात आली.120 गावामधून प्रत्येक गावातील 5 अल्पभूधारक शेतक–यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. एकूण 600 अल्पभूधारक शेतक–यांची माहीती गोळा करून सांख्यकिय पध्दतीने माहीतीचे विश्लेषण करण्यात आले आहे. विश्लेषणासाठी सरासरी शेकडा प्रमाण या सांख्यकिय साधनांचा वापर केला गेला आहे.



3/6

द्वितीय साधनसामग्रीमध्ये कोल्हापूर जिल्हा गॅझेटीयर,कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,भारताची व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,विविध शासकीय प्रकाशने, संकेतस्थळे,संदर्भग्रंथ ,अहवाल,संशोधनात्मक लेख इ.चा आधार घेतलेला आहे. अभ्यासाकरीता सन 1994–95 ते 2014–15 या कालावधीतील माहीतीचा विचार करण्यात आलेला आहे.

**अल्पभूधारक शेतकरी कुटुंबाची व्याख्या**

''कोल्हापूर जिल्हयातील स्वतःच्या मालकीची 5 एकर व त्यापेक्षा कमी शेतजमीन असणा–या शेतकरी कुटुंबाचा समावेश अल्पभूधारक शेतकरी कुटुंब असा करण्यात आलेला आहे''

**उत्पन्न गटानुसार वर्गीकरण**

शोध निबंधाचा अभ्यास करत असताना शेतक–यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न विचारात घेतलेले आहे. उत्पन्नानुसार कुटुंबाचा सामाजीक आर्थिक दर्जा ठरत असतो. जास्त उत्पन्न असेल तर शेतक–यांना आपल्या जिवनावश्यक गरजांची पुर्तात करता येते आणि जिवनमानाच्या दर्जात वाढ करता येते. कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांचे उत्पन्न हे अत्यंत कमी आहे. हे खालील प्रमाणे तक्ता क. 1 मधील माहीतीवरून लक्षात येते

**तक्ता क. 1**

| अ. क. | वार्षिक उत्पन्नाचा तपशील रू. | 1994–95 | | 2014–15 | |
|---|---|---|---|---|---|
| | | शेतकरी संख्या | टक्केवारी | शेतकरी संख्या | टक्केवारी |
| 1 | 25,000 रू.पेक्षा कमी | 243 | 40.5 | 100 | 16.7 |
| 2 | 25,000रू ते 50,000रू | 93 | 15.5 | 178 | 29.7 |
| 3 | 50,000रू ते 75,000 रू | 69 | 11.5 | 165 | 27.5 |
| 4 | 75,000रू ते 100,000रू | 104 | 17.3 | 42 | 7.0 |
| 5 | 100,000 रू ते 1,25,000रू | 66 | 11.0 | 86 | 14.3 |
| 6 | 1,25,000 रू ते 1,50,000 रू | 15 | 2.5 | 17 | 2.8 |
| 7 | 1,50,000रू ते 1,75,000 रू | 9 | 1.5 | 4 | 0.7 |
| 8 | 1,75,000रू ते 2,00,000 रू | 1 | 0.2 | 5 | 0.8 |
| 9 | 2,00,000,रू पेक्षा जास्त | 00 | 00 | 3 | 0.5 |
| | **एकूण** | **600** | **100.0** | **600** | **100.0** |

स्त्रोत प्रत्यक्ष पाहणी

१. 25,000 रू पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणा–या शेतक–यांची संख्या 1994 – 95 मध्ये 243 इतकी होती. ती कमी होवून 2014 – 15 मध्ये 100 वर आली. अर्थातच ती 40.5 टक्केवरून 16.7टक्के इतकी कमी झाली.

२. 25,000 ते 50,000 रू वार्षिक उत्पन्न असणा–या शेतक–यांची संख्या 1994 – 95 मध्ये 93 तर 2014–15 मध्ये 178 इतकी वाढली. हे प्रमाण 15.5 टक्केवरून 29.7 टक्के इतके वाढले.

३. 50,000 रू ते 75,000रू वार्षिक उत्पन्न असणा–यांची संख्या 1994 –95 मध्ये 69 होती. ती वाढून 2014 –15 मध्ये 165 इतकी झाली. हे प्रमाण 11.5 वरून 27.5 टक्के इतके वाढल्याचे दिसते.

४. 75,000रू ते 100,000 रू उत्पन्न असणा–यांची संख्या 1994 – 95 मध्ये 104 तर 2014 – 15 मध्ये 42 इतकी होती. टक्केवारी मध्ये हे प्रमाण 17.3 टक्के व 7.0 टक्के इतके होते.

५. 100,000रू ते 1,25,000 रू उत्पन्न गटातील शेतक–यांची संख्या 1994 – 95 मध्ये 66 तर 2014–15 मध्ये 86 इतकी होती. टक्केवारी मध्ये हे प्रमाण 11.0 टक्के वरून 14.3 टक्के इतके वाढलेले दिसते.

६. 1,25,000 रू ते 1,50,000 रू उत्पन्न गटातील संख्या 1994 –95 मध्ये 15 तर 2014 –15 मध्ये 17 इतकी होती. हे प्रमाण 2.5 टक्के व 2.8 टक्के इतके होते.

७. 1,50,000 रू ते 1,75,000 रू उत्पन्न गटातील शेतक–यांची संख्या 1994 –95 मध्ये 09 तर 2014 – 15 मध्ये 04 इतकी होती. टक्केवारी मध्ये हे प्रमाण 1.5 टक्के व 0.7 टक्के इतके कमी होते.

८. 1,75,000 ते 2,00,000 रू वार्षिक उत्पन्न असणा–या शेतक–यांची संख्या 1994 – 95 मध्ये फक्त 01 तर 2014 –15 फक्त 05 इतकी कमी होती. टक्केवारी मध्ये हे प्रमाण 0.2 टक्के व 0.8 टक्के इतके नगण्य होते.

९. 2,00,000 रू पेक्षा जास्त उत्पन्न असणा–या एकही शेतकरी 1994 –95 मध्ये नव्हता तर 2014 – 15 फक्त 03 शेतक–यांचे वार्षिक उत्पन्न 2,00,000 रू पेक्षा जास्त आहे.

यावरून असे लक्षात येते की, 1994 – 95 च्या तूलनेत 2014–15 मध्ये जास्त उत्पन्न असणा–या शेतक–यांची संख्या वाढली असली तरी 2,00,000 रू च्या आतच हे उत्पन्न वाढल्याचे दिसते. म्हणजेच कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांचे वार्षिक उत्पन्न अत्यंत कमी आहे.

**उत्पन्नातील सर्वाधीक खर्चाचे वर्गीकरण**

आपल्या उत्पन्नातील सर्वाधीक रक्कम कोणत्या गोष्टीवर खर्च केली जाते, यावरून सुध्दा त्या व्यक्तीचा अथवा कुटुंबाचा सामाजीक आर्थिक स्तर लक्षात येतो. जर हा खर्च आपल्या जिवनावश्यक मूलभूत गरजा भागवण्यासाठी केला जात असेल तर निश्चितच अशा कुटुंबाची सामाजीक आर्थिक स्थिती हालाखीची आहे. हे लक्षात येते. कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांचा सर्वाधीक खर्च कशावर होतो, याची माहीती नमुना सर्वेक्षणाच्या साहयाने घेण्यात आली.ती तक्ता क्र.2 मध्ये दाखवण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र.2**

| अ.क्र. | खर्च तपशील | 1994–95 | | 2014–15 | |
|---|---|---|---|---|---|
| | | शेतकरी संख्या | टक्केवारी | शेतकरी संख्या | टक्केवारी |
| 1 | अन्नधान्य | 465 | 77.5 | 563 | 93.8 |
| 2 | कपडे लत्ते | 404 | 67.3 | 541 | 90.2 |
| 3 | आरोग्य | 340 | 56.3 | 493 | 82.2 |
| 4 | शिक्षण | 174 | 29.0 | 500 | 83.3 |
| 5 | करमणूक | 12 | 2.0 | 108 | 18.4 |
| 6 | सवय / व्यसन | 14 | 2.3 | 22 | 3.7 |
| 7 | कर्ज व व्याज फेड | 72 | 12.0 | 46 | 7.7 |
| 8 | शेतीसाठी | 458 | 76.3 | 478 | 79.7 |
| 9 | धार्मिक सण – उत्सव | 143 | 23.8 | 217 | 36.2 |
| 10 | यात्रा | 23 | 3.8 | 78 | 13.0 |
| 11 | प्रवास | 17 | 2.8 | 111 | 18.5 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | कोर्टकचेरी | 3 | 0.5 | 3 | 0.5 |
| 13 | या व्यातीरिक्त | 2 | 0.3 | 3 | 0.5 |

स्त्रोत. प्रत्यक्ष पाहणी

तक्त्यात दाखवल्याप्रमाणे 1994 – 95 व 2014 –15 मध्ये सुध्दा कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांना सर्वाधीक खर्च अनुकमे अन्नधान्य , कपडेलत्ते आरोग्य आणि शिक्षण या मुलभूत गरजा भागवण्यासाठी करावा लागतो. व त्या खालोखाल शेती आदानांसाठी खर्च केला जातो.

**उपाय योजना**

अल्पभूधारक शेतकरी कुटूंबांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी व चांगले जीवनमान जगता यावे यासाठी खालील उपाय योजना कराव्या लागतील.

1. शेतक–यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित न्याय किंमत देण्यात यावी.
2. शेतमालाच्या उत्पादन खर्चामध्ये 50 टक्के नफयाचा समावेश करावा
3. शेती आधारित उद्योगांच्या उभारणीसाठी 100 टक्के शासकीय अनुदान देण्यात यावे.
4. शेतक–यांच्या शेतीला बारामाहि पाणि पुरवठयाची सुविधा उपलबध करून द्यायावी.
5. शेतक–यां 100 टक्के अनुदानावर खते,किटकनाशके,बी बीयाणे उपलबध करून द्यावीत.
6. सार्वजनिक वितरण प्रणालिच्या माध्यमातून अन्न,धान्य ,कपडेलत्ते सवलतीच्या दरात उपलब्ध करून द्यावित.
7. शेतक–यांच्या कुटुंबाला मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यावीत.
8. शेतक–यांच्या मुलाना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत देण्यात यावे.

**सारांश**

अशा प्रकारे कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांचे उत्पन्न 2,00,000 रू पेक्षा कमी असून एकूण उत्पन्नाच्या सर्वाधिक रक्कम जीवनावश्यक वस्तू व सेवावर खर्च करावाला लागते.त्यामूळे शेतक–यांना हालाखी मध्ये जीवन जगावे लागत आहे.त्याना चांगल्या दर्जाचे जीवनमान जगता यावे म्हणून त्यांच्या उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे.या करीता सरकारने वरिलप्रमाणे सुचवलेल्या उपाय योजनाची योग्यरितीने अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

1. जिल्हा सामाजीक व आर्थिक समालोचन (2014) , महाराष्ट् शासन,नियोजन विभाग,अर्थ व सांख्यकी संचालनालय,जिल्हा सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर.
2. प्रा. डॉ. मुकुंद गायकवाड, शेतकरी मित्रांचे प्रश्न आणि प्रश्न, (2004) , उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना,पुणे.
3. सुधीर श्रीधर कुलकर्णी , शेतीची काटेरी वाट (2013),तेजस प्रकाशन, कोल्हापूर.
4. कि. का. चौधरी, महाराष्ट्राज्य गॉझेटीयर,कोल्हापूर जिल्हा (1989) ,दर्शनिका विभाग, महाराष्ट् शासन, मुंबई.
5. एस. के. ढगे व सी.पी. हासे, संशोधन पध्दती (2011),के.एस. पब्लिकेशन पुणे.